**नि.दि.दा.क्र.१२९/२०१२**
**दामोदर वि. गोरोबा व इतर**
**CNR No.MHOS130004342012**

## निशानी क्र.१०२ च्या अर्जावरील आदेश

(घोषीत दिनांक – २३.०१.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे, मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे हे दिनांक २५.०४.२०२५ रोजी मयत झाले आहेत व वादी क्र.२/अ चे वारस अभिलेखावर घेणे जरुरीचे होते. वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस हे मुंबई येथे राहत असल्या कारणाने वादी नं.२/अ यांच्या विरोधात ॲबेट झाले आहे. मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. वादीने हेतुपुरस्कर विलंब केलेला नाही. तसेच सदर विलंब हा नाममात्र स्वरुपाचा आहे. मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे वारस अभिलेखावर न घेतल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. कारण दाव्यातील विवाद्य जमीनीमध्ये वादीचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी हे सदरच्या अर्जास म्हणणे दिले असुन त्यांनी सदरचा अर्ज मान्य असल्याचे सांगीतले आहे अथवा सदरचा अर्ज हा दंडासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**०४.** अर्जदार यांनी नि.क्र.१०४ कडील पुरसीस सोबत मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत सादर केलेले आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक १४.१०.२०२५ रोजी दाखल करण्यांत आलेला आहे. वस्तुतः मयताचे वारस हे अभिलेखावर घेण्यासाठी जवळपास दोन महिने इतका विलंब झालेला आहे. प्रतिज्ञक उषा बाबासाहेब बरगे यांनी शपथेवर असे सांगितले आहे की, वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे हे दिनांक २५.०४.२०२५ रोजी मयत झाले असुन वादी नं.२/अ चे वारस हे मुंबई येथे राहत असल्याकारणाने ते वेळेवर सदरचा अर्ज दाखल करु शकले नाहीत. सबब, मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत.

**०५.** प्रस्तुत अर्ज, वादी यांच्या वकीलाचा युक्तीवाद व अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण हे वादीने मालकी जाहीर करण्याकरता व निरंतर मनाई मिळणेबाबत दाखल केले असुन प्रस्तुत अर्ज मंजुर न झाल्यास अर्जदारांचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यांत यावा अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

**०६.** मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांच्या मृत्युनंतर देखील सदरचा दावा चालविण्याचा वारसाचा अधिकार हा टिकून राहतो (Right to sue). त्यामुळे मयत वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे. असे न केल्यास प्रस्तुत दावा हा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. त्यामुळे विलंबाच्या कारणांचा विचार करुन वादीवर निशानी १०० वरील दंडाची पुर्तता केल्यानंतर सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत ठरेल. त्याप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत **निशानी क्र.१०२** चा अर्ज **निशानी १००** वरील दंडाची पुर्तता केल्यानंतर मंजुर करण्यात येतो.

२. वादी नं.२/अ नामे बाबासाहेब साहेबराव बरगे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यांत येत आहे.

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2026.01.23 17:51:10 +0530

दिनांक : २३.०१.२०२६

( **श्रीमती अश्लेषा एस. मते** )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | N. V. Koli<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Jr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 23.01.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 23.01.2026 |
| Order uploaded on | ... | 23.01.2026 |